# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१ mail :pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेस नोट क्र-७७ दिनांक:- २८/०३/२०२१

## मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय क्षेत्रात दि. १५/०४/२०२१ पर्यंत दररोज रात्रौ २०.०० वा. पासुन ते सकाळी ०७.०० वा. पावेतो मनाई आदेश लागु

कोरोना विषाणुमुळे पसरत असलेला साथीचा संसर्गजन्य आजार भारतात, महाराष्ट्रात व मिरा-भाईंदर, वसई-विरार शहरात गतीने पसरत असल्याचे दिसुन येत आहे. त्याअनुषंगाने महाराष्ट्र शासनाने कोरोना विषाणु (कोविड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथीचा रोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३/०३/२०२० रोजीपासुन लागु केला असुन, महाराष्ट्र शासन नोटिफिकेशन क्र. डीएमयु/२०२०/सीआर ९२/आपत्तीव्यवस्थापन-१ दिनांक २७/०३/२०२१ अन्वये दिनांक १५/०४/२०२१ पर्यंत नाईट कर्फ्यु लागु केला आहे.

कोरोना विषाणुमुळे पसरत असलेल्या संसर्गजन्य आजारास तात्काळ प्रतिबंधक उपाययोजना म्हणुन खालील व्यक्ती, आस्थापना यांना उद्देशुन पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), मिरा-भाईंदर वसई-विरार यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) (३) अन्वये दिनांक २८/०३/२०२१ ते दिनांक १५/०४/२०२१ रोजी पर्यंत रात्रौ २०.०० वा. ते दुसऱ्या दिवशी पहाटे ०७.०० वा. पर्यंत मनाई आदेश लागु केला आहे. मनाई आदेशा प्रमाणे मिरा-भाईंदर वसई-विरार आयुक्तालय कार्यक्षेत्रात दररोज रात्रौ २०.०० वा.पासुन ते सकाळी ०७.०० वा. पावेतो मनाई आदेश लागु राहील. सदर मनाई आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भारतीय दंड विधान संहिता कलम १८८ प्रमाणे शिक्षेस पात्र राहील.

**या कालावधीत खालील बाबी चालु राहणार नाहीत.**

- सर्व प्रकारचे सार्वजनिक ठिकाणी, उदयाने, समुद्रकिनारी भागात विनाकारण फिरणे, विरंगुळयासाठी फिरणे, सायकल, मोटारसायकल, मोटारवाहनातील विनाकारण फेर फटका मारणे, अनावश्यक व विनाकारण होणारी वाहतुक.
- सर्व प्रकारच्या आस्थापना, चित्रपटगृहे, मॉल्स, सभागृहे, हॉटेल्स, रेस्टॉरंटस्, बंद राहतील परंतु हॉटेल्स व रेस्टॉरंट यांचेकरीता होम डिलीवरी चालु राहील.
- पाच किंवा पाचपेक्षा जास्त व्यक्ती एकत्र जमणार नाहीत.
- कोणत्याही प्रकारच्या सांस्कृतिक कार्यक्रम, सामाजिक, राजकीय, धार्मिक, खाजगी समारंभ, मनोरंजनाचे कार्यक्रम, क्रिडा स्पर्धा, याकरीता एकत्र येण्यास मनाई आहे.
- लग्न समारंभाकरीता ५० व्यक्तीं व अंत्यविधीकरीता २० व्यक्तींपेक्षा जास्त लोक एकत्र जमणार नाहीत.

**या कालावधीत खालील बाबी चालु राहतील.**

- सदर आदेशामुळे यापुर्वी शासनाने ज्या आस्थापना सुरु ठेवण्याबाबत परवानगी दिलेली आहे त्या वैदयकीय सेवा पुरविणाऱ्या आस्थापना, अत्यावश्यक सेवा बजावणारे, अत्यावश्यक किंवा तातडीची वैदयकीय गरज तसेच अत्यावश्यक सेवा, उदा.भाजीपाला व दुध यांची वाहतुक व पुरवठा इत्यादी.

नागरिकांनी मनाई आदेशाचे पालन करावे व कोरोना विषाणुमुळे पसरत असलेल्या संसर्गजन्य आजारास आळा घालण्यास शासनास आणि पोलीस प्रशासनास सहकार्य करावे असे मा. पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर वसई-विरार यांनी जनतेस आव्हान केले आहे.

-------oooo------

Scanned with CamScanner